महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत यांना मानधन योजना नियमात सुधारणा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

## शासन निर्णय क्रमांकः वृकमा २०१२/प्र.क्र.११७/सां.का.४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१४

वाचा -

१) शासन निर्णय, समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. डीटीडब्ल्यू २६५/ एन, दि. ११.८.१९६५
२) शासन निर्णय, समाज कल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र. एफएएस १०९०/प्र.क्र.३००/सां.का.१, दि. १६.३.१९९१
३) शुध्दीपत्रक समाज कल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र. एफएएस १०९०/ प्र.क्र.३००/सां.का.१, दि. ३०.३.१९९१
४) शासन निर्णय, समाज कल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र. एफएएस १०९१/५५२५७/प्र.क्र.४४६/सां.का.१, दि. १८.६.१९९२
५) शासन शुध्दीपत्रक, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र. एफएएस १०९१/५५२५७/प्र.क्र.४४६/सां.का.१, दि. ८.१०.१९९२
६) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. एफएएस १९९३/ २३८०९/प्र.क्र.२७९/सां.का.१, दि. २.६.१९९४
७) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र एफएएस १०९७/ प्र.क्र.१८१/सां.का.१, दि. २१ ऑक्टोबर, १९९७
८) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. एफएएस १०९९/ प्र.क्र.११०/सां.का.१, दि. २९.५.१९९९
९) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. सांकासं २०००/ प्र.क्र.३१४/सां.का.१, दि. २१.१०.२०००
१०) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. एफएएस १०९८/ प्र.क्र.१८८/सां.का.१, दि. २०.११.२०००
११) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र. सांकासं २००४/प्र.क्र.२४/सां.का.३, दि. १ जून, २००४
१२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. वृकमा २००८/प्र.क्र.३२४/ सां.का.३, दि. २३.७.२००९

प्रस्तावना -

राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना मानधन ही योजना राज्य शासनामार्फत सन १९५४-५५ पासून राबविण्यात येते. या योजनेच्या नियमामध्ये उपरोक्त संदर्भाधीन शासन

Scanned with OKEN Scanner

निर्णयान्वये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या होत्या. या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कालानुरुप काही सुधारणा करणे आवश्यक असल्यामुळे तसेच या योजनेबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व नियमांमध्ये सुसुत्रीपणा आणणे आवश्यक असल्याने याप्रकरणी पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन सर्वसमावेशक अशी एकच सुधारीत नियमावली तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

मात्र, पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करीत असताना काहीवेळा काही प्रकरणांच्या अनुषंगाने पूर्वी घेण्यात आलेले निर्णय संदर्भ म्हणून पहावे लागतात. त्यामुळे त्याबाबतचे संदर्भ, जुने शासन निर्णयाचा शोध घेऊन पाहण्याऐवजी याच शासन निर्णयामध्ये संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे घेण्यात आलेल्या महत्वपूर्ण निर्णयाबाबतची सारांश माहिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे. जेणेकरुन ख-या अर्थाने हा शासन निर्णय सर्व समावेशक होईल.

| अ. क्र. | शासन निर्णयाचा दिनांक | घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|
| १ | ११ ऑगस्ट, १९६५ | यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारीत नियमावली तयार करण्यात आली. |
| २ | १६ मार्च, १९९१ | मानधनाच्या रक्कमेत वाढ-<br>अ वर्ग कलावंत रु.६,०००/- वार्षिक<br>ब वर्ग कलावंत रु,४,८००/- वार्षिक<br>क वर्ग कलावंत रु,३,६००/- वार्षिक |
| ३ | १८ जून, १९९२ | सदर योजना जिल्हा परिषदेकडे अभिकरण तत्वावर राबविण्यासाठी सुपूर्द करण्यात आली. त्यानुसार कलावंतांची निवड राज्यशासनाच्या स्तरावर उच्चास्तरीय समितीमार्फत करण्यात येईल. तर कलावंताचे मानधन हे जिल्हा परिषदेकडून गट विकास अधिका-यामार्फत मनिऑर्डरद्वारे कलावतांना अदा करण्यात येईल. |
| ४ | ८ ऑक्टोबर, १९९२ | आहरण व संवितरण अधिकारी म्हणून गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांचेऐवजी जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची नेमणूक. मुख्य लेखा व वित्त अधिकारी कोषागारातून काढून सदर रक्कम जिल्हा निधीमधून संबंधित गटविकास अधिका-याकडे वित्तप्रेक्षणाने देतील व गट विकास अधिका-याद्वारे मानधनाची रक्कम मनिऑर्डरद्वारे दरमहा कलावंतांना अदा करण्यात येईल. |
| ५ | २ जून, १९९४ | मानधनाच्या रक्कमेत वाढ<br>अ वर्ग कलावंत रु.८,४००/- वार्षिक<br>ब वर्ग कलावंत रु,७,२००/- वार्षिक<br>क वर्ग कलावंत रु.६,०००/- वार्षिक |
| ६ | २१ ऑक्टोबर, १९९७ | मानधनाची रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्याचा निर्णय |
| ७ | २९ मे, १९९९ | पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करुन नवीन नियमावली तयार केली. |



Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | शासन निर्णयाचा दिनांक | घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|
| ८ | २१ ऑक्टोबर, २००० | विभागाच्या अनेक योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्याचा तत्वत: निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये वृध्द कलावंत मानधन योजनेचा समावेश आहे |
| ९ | २० नोव्हेंबर, २००० | कलावंताचे मानधन धनादेशाऐवजी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेतील खात्यात थेट जमा करणे. |
| १० | १ जून, २००४ | अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशाने वृध्द कलावंत मानधन योजनेअंतर्गत कलावंतांची निवड करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेकडे वर्ग केले. |
| ११ | २३ जुलै, २००९ | मानधनाच्या रक्कमेत वाढ<br>अ वर्ग कलावंत रु.१६,८००/- वार्षिक<br>ब वर्ग कलावंत रु,१४,४००/- वार्षिक<br>क वर्ग कलावंत रु.१२,०००/- वार्षिक |

**शासन निर्णय -**

विचारांती महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना मानधन मंजूर करण्याबाबत **यापूर्वी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन, या शासन निर्णयान्वये सुधारीत नियमावली मंजूर करण्यात येत आहे.**

या योजनेअंतर्गत वृध्द साहित्यिक व कलावंत यांनी जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे किंवा तालुका स्तरावर पंचायत समितीकडे तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर या २ जिल्हयांसाठी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे मानधन मिळण्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज करण्याचा विहित नमुना सोबतच्या **परिशिष्ट-१** येथे देण्यात आला आहे.

संबंधित समाज कल्याण अधिकारी / गट विकास अधिकारी / विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारा अर्ज विहित नमुन्यात असल्याचे व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडली असल्याचे तपासून त्यांची सविस्तर नोंद नोंदवहीमध्ये घ्यावी व अर्जदाराला त्याबाबतची पोच पावती द्यावी.

संबंधित समाज कल्याण अधिकारी / गट विकास अधिकारी / विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे आलेले अर्ज प्राप्त तारखेनुसार लावण्यात येतील व त्यांना नोंदणी क्रमांक देऊन एका स्वतंत्र नोंदवहीमध्ये त्याची नोंद घेण्यात येईल. तसेच अर्जदाराचे नाव, महिला / पुरुष, वय, पत्ता, दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक, उत्पन्न, कलाप्रकार अथवा साहित्य क्षेत्रातील कामगिरीबाबत जोडलेल्या पुराव्याचा तपशील इ. ची नोंदवहीत नोंद घेण्यात यावी. वरील सर्व नोंदीच्या अनुषंगाने गोषवारा तयार करण्यात यावा.



Scanned with OKEN Scanner

प्राप्त अर्जांची सोबत जोडलेल्या **परिशिष्ट २** मधील अटी व शर्तीनुसार छाननी करण्यात यावी. त्यामधील प्रमुख निकष खालीलप्रमाणे आहेत.

१. साहित्य व कला या क्षेत्रात ज्यांनी मोलाची भर घातली आहे अशी व्यक्ती,
२. कला आणि वाङ्.मय क्षेत्रात ज्यांनी किमान १५ ते २० वर्षे इतक्या प्रदीर्घ काळासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे अशा व्यक्ती,
३. ज्या स्त्री / पुरुष कलाकाराचे व साहित्यिकांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त आहे, अशा व्यक्ती,
४. साहित्यिक व कलावंत यांच्या निधनानंतर त्यांच्या विधवा पत्नी / विधुर पती यांना तहहयात मानधन मिळेल.
५. जे साहित्यिक व कलावंत अर्धांगवायू, क्षय, कर्करोग, कुष्टरोग या रोगांनी आजारी असतील तसेच ज्यांना ४०% पेक्षा जास्त शारिरिक व्यंग असेल किंवा अपघाताने ४०% पेक्षा जास्त अपंगत्व आले असेल व त्यामुळे ते स्वतःचा व्यवसाय करु शकत नसतील, असे साहित्यिक व कलावंत यांच्यासाठी वयाची अट शिथिल करण्यात येईल.
६. वयाने वडील असणा-या व विधवा / परितक्त्या वृध्द साहित्यिक व कलावंत यांना मानधन देण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.
७. ज्या साहित्यिक व कलावंतांचे सर्व मार्गाने मिळून वार्षिक उत्पन्न रु.४८,०००/- पेक्षा जास्त नाही.

अर्जांच्या छाननीबाबतचा अहवाल संबंधित अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी / संचालक, सांस्कृतिक कार्य यांना सादर करण्यात यावा. त्यानंतर अर्जाच्या छाननी अंती निकषानुसार पात्र होणारे अर्ज जिल्हास्तरीय निवड समितीसमोर निर्णयासाठी सादर करण्यात यावेत.

प्रत्येक जिल्हयासाठी **परिशिष्ट- ३** मध्ये नमूद केल्यानुसार या योजनेअंतर्गत मानधनासाठी साहित्यिक व कलावंत यांना पात्र ठरविण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती गठीत करण्यात येईल. जिल्हास्तरीय निवड समितीने प्रत्येक आर्थिक वर्षी बैठक घेणे त्याचप्रमाणे बैठकीत छाननीअंती निकषांची पुर्तता करणा-या पात्र अर्जांमधून इष्टांकानुसार ६० साहित्यिक व कलावंत यांना मानधनासाठी निवड करणे बंधनकारक राहील.

जिल्हास्तरीय निवड समितीच्या बैठकीच्या आयोजनासंदर्भातील मार्गदर्शक सूचना **परिशिष्ट- ४** मध्ये नमूद केल्या आहेत.

जिल्हास्तरीय निवड समिती प्रत्येक आर्थिक वर्षी बैठक घेऊन त्यावेळी शासनाच्या आदेशांची व ठरविलेल्या निकषांची पुर्तता करणा-या पात्र अर्जांमधून कमाल ६० या इष्टांकाच्या मर्यादेतच साहित्यिक व कलावंत यांना मानधनासाठी पात्र ठरवेल व त्यांची खालीलप्रमाणे वर्गवारी निश्चित करेल.

| अ. क्र. | वर्गवारी मंजूर संख्येशी टक्केवारी) | निकष |
|---|---|---|
| १ | अ वर्ग (१० टक्के) | राष्ट्रीय पातळीवर वृध्द साहित्यिक व कलाकार |
| २ | ब वर्ग (३० टक्के) | राज्य पातळीवर वृध्द साहित्यिक व कलाकार |
| ३ | क वर्ग (६० टक्के) | जिल्हा पातळीवर वृध्द साहित्यिक व कलाकार |



Scanned with OKEN Scanner

याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत निर्गमित झाल्यानंतर जिल्हा परिषदेमार्फत संबंधित साहित्यिक व कलावंत यांना मानधन मंजूर झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात यावेत. तसेच शासनाकडून संचालनालयामार्फत जिल्हा परिषदेस संगणक वितरण प्रणालीद्वारे प्राप्त मानधनाची रक्कम पात्र साहित्यिक व कलावंत यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

मानधन मंजूरीचे आदेश निर्गमित झाल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांस तहहयात मानधन मिळेल. त्यासाठी पुन्हा प्रत्येक वर्षी नव्याने जिल्हास्तरीय समितीस कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. फक्त प्रतिवर्षी हयातीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

या योजनेअंतर्गत मानधन मिळणा-या लाभार्थ्यांचे निधन झाल्यास त्याच्या पत्नीस किंवा त्यांच्या पतीस तहहयात मानधन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी दिवंगत वृध्द साहित्यिक अथवा कलावंत यांच्या पत्नी किंवा पतीस पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही. तथापि, दिवंगत लाभार्थ्यांच्या मृत्युचे प्रमाणपत्र आणि ते लाभार्थ्यांचे वारसदार असल्याबाबतचे तहसिलदार यांचे प्रमाणपत्र समाज कल्याण अधिकारी / गट विकास अधिकारी यांना सादर करणे आवश्यक राहील. संबंधित अधिका-यांनी कागदपत्रांची शहानिशा करुन प्रस्ताव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेस्तव सादर करावा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वारसदारांना मानधन मंजुर करण्याचे अधिकार सदर शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात येत आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेनंतर त्यांच्या वारसदारास तहहयात मानधन अदा करण्यात येईल. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्हयांसाठी वारसदारांना मानधन मंजूर करण्याचे अधिकारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना प्रदान करण्यात येत असून त्यांनी वरील नमूद कार्यपध्दतीनुसार वारसदारांना मानधन मंजूर करावे.

जिल्हयातील पूर्वीच्या पात्र कलावंतांना शासनाकडून प्रत्येक आर्थिक वर्षी मानधन अदा करण्यात येते. सदर मानधन अदा केल्यानंतर ते मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे बंधनकारक आहे. सदर उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय शासनाकडून पुढील कालावधीच्या मानधनाची रक्कम वितरीत केली जाणार नाही. उपयोगिता प्रमाणपत्र विलंबाने मिळाल्यामुळे कलावंतांना पुढील कालावधीतील मानधन मिळण्यास विलंब झाल्यास त्यासाठी समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर साठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना जबाबदार धरण्यात येईल.

जिल्हास्तरीय निवड समितीच्या बैठकीमध्ये इष्टांकानुसार मानधनासाठी साहित्यिक व कलावंत यांना पात्र ठरविण्यासंदर्भात काही मतभेद उदभवल्यास अशी प्रकरणे समितीच्या शिफारशीसह पुर्नविलोकन करण्यासाठी १५ दिवसाच्या आत संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात यावीत व संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयाने त्याबाबत छाननी करुन त्यांच्या शिफारशीसह प्रस्ताव १५ दिवसाच्या आत शासनास सादर करावा. प्राप्त प्रस्तावातील प्रश्न योजनेसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा असेल तर मा. मंत्री (सां.का.) यांच्या मान्यतेने अंतिम निर्णय घेण्यात येईल. मात्र, प्रस्तावातील प्रश्न योजनेच्या अंमलबजावणी करताना उदभणा-या अडचणी संदर्भात असेल तर प्रधान सचिव (सां.का.) यांच्या मान्यतेने आवश्यक ते प्रशासकीय मार्गदर्शन करण्यात येईल. शासनाने घेतलेला निर्णय संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्यामार्फत संबंधित जिल्हयाचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अवगत करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

साहित्यिक / कलावंत यांना या योजनेअंतर्गत मानधनासाठी पात्र ठरवून त्यांची मानधनाच्या रक्कमेसाठी श्रेणी निश्चित केल्यानंतर (म्हणजेच अ,ब व क अशी वर्गवारी) भविष्यात त्यांची श्रेणी बदलता येणार नाही.

या योजनेअंतर्गत मान्यवरांना पात्र ठरविण्यासाठी गठीत करण्यात येणा-या जिल्हास्तरीय निवड समितीच्या अशासकीय सदस्यांना अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता व दैनिक भत्ता हा शासन निर्णय वित्त विभाग क्र. प्रवास १०१०/प्र.क्र.२/सेवा ५ दि. ३ मार्च, २०१० अन्वये तसेच या समितीवरील अशासकीय सदस्यांना बैठकभत्ता शासन निर्णय वित्त विभाग क्र. बैठक २०१२/ प्र.क्र.१/सेवा-५, दि. २४ मे, २०१२ अन्वये अनुज्ञेय राहील.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मंजूर मानधन दरमहा अदा करण्यासाठी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयाकरीता संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना तसेच अन्य जिल्हयासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिका-यांना या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयासाठी येणारा खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, (८००) इतर खर्च, (०१) (०१) साहित्य/कला इत्यादी क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना वित्तीय सहाय्य (२२०५ १९०१), योजनेतर योजना, ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन त्या त्या आर्थिक वर्षामधील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

तसेच इतर जिल्हयासाठी येणारा खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, २२०५-कला व संस्कृती, (८००) इतर खर्च, (०१) (०१) साहित्य, कला इत्यादी क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना वित्तीय सहाय्य (२२०५ १९०१) योजनेतर योजना, ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन त्या त्या आर्थिक वर्षामधील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २६५/व्यय-१४, दि.९.९.२०११ व अनौपचारिक संदर्भ क्र. २०९/सेवा-५, दि.१४.९.२०११ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२०७१६४१३४०७२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सोबत : परिशिष्ट १ ते परिशिष्ट ६

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TCA, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2014.02.14 16:23:37 +05'30'

(गीता रा. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव



Scanned with OKEN Scanner